Research Papers

# मराठवाडी ग्रामीण कादंबरी : एक चिकित्सक अभ्यास

प्रा. रविकिरण षेटे
रामकृश्ण परमहंस महाविद्यालय,
उस्मानाबाद
मो.नं.9175399756

## प्रस्तावना :—

नवसाहित्यीकांच्या केंद्रस्थानी असलेला वाङ्मय प्रकार म्हणजे मराठी ग्रामीण कादंबरी. मराठी वाङ्मयात आज ग्रामीण कादंबरीने फार मोठा प्रांत काबीज केलेला असला तरी संशोधनाच्या पातळीवर यावर व्यापक संशोधनक असे झाले नाही. ग्रामीण साहित्य फार मोठया प्रमाणात लिहिले गेले असले तरी संशोधनाच्या आणि समीक्षेच्या बाबतीत हे साहित्य उपेक्षीत राहिल्याचे दिसते. विशेशतः मराठवाडयातील साहित्यीकांच्या साहित्याबद्दल तर हा समीक्षक वर्ग नेहमी उदासीन असल्याचा दिसतो. श्मराठवाडी ग्रामीण कादंबरीश तर स्वतंत्र अभ्यासाचा विशय व्हावा इतके दालन तिने मराठी साहित्याचे व्यापले आहे, आणि याच मराठवाडी ग्रामीण कादंबरीचा सर्वांगाने अभ्यास व्हावा हे प्रयोजन किंवा हा हेतू मला माझ्या संशोधनात अभिप्रेत आहे. त्यामुळेच श्मराठवाडी ग्रामीण कादंबरीश सुरुवातीपासून किंवा प्रारंभापासून ते आजपर्यंतच्या चिकित्सक अभ्यास व्हावा म्हणून हा विशय घेवून त्यावर संशोधन करावे अशी माझी भूमिकाक आहे.

मराठी साहित्यामध्ये कथा, काव्य, नाटक हे साहित्यप्रकार जुने असले, सनातन आहेत, केवळ मुद्रणकलेच्या अभावामुळेक मराठीमध्ये कादंबरीच्या जन्माला उशीर झाला. कारण मुळातच कादंबरी हा वाङ्मयप्रकार परकीय होता. श्बाबा पद्मनजीश यांच्या इत्रसत्र1857 मध्ये प्रसिध्द झालेल्या श्यमुना पर्यटनश या कादंबरीच्या रुपाने मराठीत कादंबरीचा जन्म झाला. इथुन सुरु झालेला कादंबरी वाङ्मयीन प्रवाह सामाजीक, भाशांतरीत अथवा रुपांतरीतक, काल्पनीक, ऐतिहासिक, राजकीय, शृंगारीक अशी वळने घेत प्रादेशीक ग्रामीण या टप्प्यावर येवुन पोहचला आहे.

गेल्या कांही वर्शात मराठी कादंबरीच्या अविश्कार स्वरूपात विलक्षण असा बदल झालेला आहे. अभिव्यक्तीचे नवे नवे प्रयोग यशस्वीपणे मराठी वाचक, रसिकांच्या समोर येत आहेत. प्रादेशिक, ग्रामीण कादंबरीक यासारख्या अभिधानांनी नव्या कादंबऱ्या प्रकाशित होउन मराठी कादंबरीची विकासगती सूचित होत आहे व मराठी कादंबरीचे दालन समृध्द होत आहे.

### विशयाचे आकर्शण :—

1. मराठी ग्रामीण कादंबरीचे स्वरुप, संकल्पना समजावून घेणे.
2. मराठवाडयाच्या जीवनातील ग्रामीण प्रादेशीकतेचे स्वरूप समजावून घेणे.
3. मराठवाडी ग्रामीण कादंबरीच्या प्रेरणाचा अभ्यास करणे.
4. मराठवाडी ग्रामीण कादंबऱ्यातील वास्तवाचा शोध घेणे.
5. मराठवाडी ग्रामीण कादंबऱ्यातील पुरुशपात्र चित्रण व स्त्रीपात्र चित्रण यांचा शोध घेणे.
6. मराठवाडी ग्रामीण कादंबरी आणि दलित कादंबरी यांच्यातील मतभेद तपासणे.
7. साठोत्तरी मराठी ग्रामीण साहित्य प्रवाह यातील मराठवाडी ग्रामीण कादंबरीचे अवतार, आगमन यांचा अभ्यास करणे.
8. मराठवाडयातील ग्रामीण कादंबरीकारांच्या निवडक, गाजलेल्या ग्रामीण कादंबऱ्याचा चिकीत्सकपणे अभ्यास करणे.

### षोध प्रबंधाच्या विशयाची व्याप्ती व मर्यादाः—

मराठवाडयातील ग्रामीण कादंबरीच्या (वेचक, निवडक, गाजलेल्या) कादंबऱ्यांचा (प्रारंभ ते आजपर्यंत) चिकित्सक अभ्यास करणे, मराठवाडयातील कादंबऱ्याच्या अनुशंगाने मराठी ग्रामीण कादंबरीचे स्वरुप, संकल्पना, प्रेरणा तसेच मराठवाडयाच्या जीवनातील ग्रामीण प्रादेशीकतेचे स्वरुप समजावून घेणे. मराठवाडी ग्रामीण कादंबऱ्यातील वास्तव, पुरुशपात्र चित्रण, स्त्रिपात्रचित्रण यांचा शोध घेणे.

साठोत्तरी मराठी ग्रामीण साहित्यप्रवाह यातील मराठवाडी ग्रामीण कादंबरीचे अवतार, आगमन यांच्या अभ्यासाबरोबरच मराठवाडी ग्रामीण कादंबरी आणि दलित कादंबरी यांच्यातील साम्यभेद तपासणे अभिप्रेत आहे. तसेच मराठी ग्रामीण कादंबरीचा अभ्यास करत असताना प्रत्येक लेखकाच्या सगळयाच कादंबऱ्याचा अभ्यास कादंबरीकारांच्या वेचक, निवडक कादंबऱ्याचा चिकित्सक (सखोल, सर्वांगीण) अभ्यास करणे शक्य होणार आहेत्र

Please cite this Article as : प्रा. रविकिरण षेटे , मराठवाडी ग्रामीण कादंबरी : एक चिकित्सक अभ्यास : Indian Streams Research Journal (Feb ; 2012)

मराठवाडी ग्रामीण कादंबरीला मराठी साहित्यात मोलाचे स्थान मिळवून देण्यास तसेच मराठी वाङ्‍मयाला पुढे नेण्यात बी. रघुनाथ, रा. रं. बोराडे, ना. धों. महानोर, गणेश आवटे, वासुदेव मुलाटे, वि.श. पारगावकर, लक्ष्मीकांत तांबोळी, शेशेराव मोहिते, भास्कर बडे, विजय शिरसाठ, भाऊराव सोमवंशी, डॉ. मधू सावंत इ. लेखकांचे योगदान आहे.

**संषोधनाचा उद्‌देष व आवष्यकता :–**

मराठवाडी ग्रामीण कादंबरी : एक चिकित्सक अभ्यास या शोधप्रबंधाच्या संदर्भाने संशोधन करत असताना कांही उद्‌देश समोर ठेवलेले आहेत. मराठवाडी ग्रामीण कादंबरीकारांच्या लेखनाची स्वरूप, वैशिश्ट्ये स्पश्ट करणे. त्यांच्या कादंबऱ्या आधारे मराठवाडयाच्या जीवनातील ग्रामीणतेचे स्वरुप, प्रेरणा, वास्तव पुरुशपात्र चित्रण यांचा चिकित्सकपणे अभ्यास करणे, शोध घेणे. साठोत्तरी मराठी ग्रामीण साहित्य प्रवाहात मराठवाडी ग्रामीण कादंबरीचे आगमन, अवतार, स्थान निश्चित करणे.

**षोधप्रबंधाच्या संषोधनाची पध्दती :–**

संशोधन हे प्रभावी, साक्षेपी व वैशिश्ट्यपूर्ण होण्यासाठी निरपेक्ष प्रवृत्तीचे चिंतन, अवलोकन, अभ्यास, तर्क, अनुभव, परीक्षण, मुलाखत इत्यादी बाबींवर शोधवृत्तीचे अधिश्ठाण लक्षात ठेवून शोधप्रबंधाच्या संशोधनासाठी खालीलप्रमाणे पध्दती स्वीकारलेली आहे.

***प्रकरण 1 ले***
***मराठी कादंबरीचे स्वरुप***

1.1 मराठी साहित्याचे प्रकार आणि प्रवाह.
1.2 कादंबरी म्हणजे काय?
1.3 कादंबरीचे घटक, कथानक, पात्र, वातावरण, निवेदनपध्दती, भाशाशैली.
1.4 कादंबरी या वाङ्‍मयप्रकाराची वैशिश्ट्ये

***प्रकरण 2 रे***
***मराठी ग्रामीण कादंबरीची संकल्पना व स्वरुप***

2.1 मराठी ग्रामीण कादंबरीची संकल्पना
2.2 मराठी ग्रामीण कादंबरीचा आढावा.
2.3 मराठी ग्रामीण कादंबरीचे कालखंडानुसार स्वरुप
2.4 ग्रामीण कादंबरीचे वेगळेपण

***प्रकरण 3 रे***
***साठोत्तरी ग्रामीण साहित्य प्रवाह आणि मराठवाडी ग्रामीण*** कादंबरी

3.1 साठोत्तरी ग्रामीण साहित्य प्रवाह
3.2 मराठवाडी ग्रामीण कादंबरी अवतार, आगमन.
3.3 मराठवाडी ग्रामीण कादंबरीचे प्रारंभीचे स्वरुप.
3.4 मराठवाडी ग्रामीण कादंबरीचे वैशिश्ट्ये

***प्रकरण 4 थे***
***मराठवाडी ग्रामीण कादंबरीच्या प्रेरणा***

4.1 मराठवाडयावरील निसर्गाची अवकृपा, दुश्काळ
4.2 शेतकरी चळवळ आणि मराठवाडी ग्रामीण कादंबरी
4.3 मराठवाडयातील लोकांचा जीवनविशयक दृश्टीकोन
4.4 वास्तव आणि मराठवाडी ग्रामीण कादंबरी

***प्रकरण 5 वे***
***मराठवाडी कादंबरीकारांच्या कादंबऱ्याचा आढावा***
***(प्रारंभ ते 2000 पर्यंत)***

5.1 मराठवाडी ग्रामीण कादंबरीचा व्याप विस्तार व टप्पे.
5.2 मराठवाडयातील राजकारण, समाजकारण, अर्थकारण, वैद्यकियक्षेत्र, शिक्षणक्षेत्र आणि ग्रामीण कादंबरीत्र
5.3 कादंबऱ्यांची तात्विक चर्चा.
5.4 मराठवाडीत्तर ग्रामीण कादंबरी आणि मराठवाडी ग्रामीण कादंबरी.
5.5 मराठवाडी ग्रामीण कादंबरीची भाशाशैली.

***प्रकरण 6 वे***
***समारोप***

वरील सर्व प्रकरणांचे निश्कर्श

***परिषिश्ट्ये***

1. संदर्भ ग्रंथ सूची
2. संदर्भ नियतकालिके.
3. मराठवाडी ग्रामीण कादंबऱ्याची सूची

**Please cite this Article as :** *प्रा. रविकिरण षेटे* **,** *मराठवाडी ग्रामीण कादंबरी : एक चिकित्सक अभ्यास* **: Indian Streams Research Journal (Feb ; 2012)**